महाराष्ट्र शासन

# विभागीय शिक्षण उपसंचालक,

पुणे विभाग पुणे-१ यांचे कार्यालय,
१७, डॉ.आंबेडकर मार्ग, लालदेवळासमोर,पुणे-४११ ००१

w'site : www.dydepune.com
e-mail : 11thonlineadmissiondydpune@gmail.com
Phone : (020) 26122217

जा.क्र.शिउसं/उमाशि-४०३/११ वी १९-२०/पुवि/२०१९/ 5806
दिनांक :- 29 JUL 2019

प्रति,

सर्व मुख्याध्यापक/प्राचार्य,
उच्च माध्यमिक शाळा/कनिष्ठ महाविद्यालय,
पुणे व पिंपरी चिंचवड महानगरपालिका क्षेत्र

विषय:-इ. ११ वी केंद्रीय ऑनलाईन २०१९-२० प्रवेशाबाबत

**संदर्भ:-१) शासन निर्णय क्रमांक न्यायाप्र-२०१५/(६१/१५)एसडी-२ दि.२८.०३.२०१६.**
**२) शासन निर्णय क्रमांक प्रवेश-२०१६/(१८०/१६)एसडी-२ दि.०७.१.२०१७.**
**३) शासन निर्णय क्र-प्रवेश-२०१९/प्र.क्र.३३३/एसडी-२,दि.०७.०३.२०१९**

इ. ११ वी केंद्रीय ऑनलाईन प्रवेश प्रक्रिया सन २०१९-२० शासन निर्णयानुसार सुरु आहे. शासनाच्या आदेशाप्रमाणे पहिल्या व दुस-या फेरी अंतर्गत विद्यार्थ्यांना प्रवेश मिळालेले आहेत व अशा विद्यार्थ्यांनी संपुर्ण फी भरुन प्रवेश निश्चित केलेला आहे. परंतु काही विद्यार्थी मिळालेला प्रवेश काही कारणास्तव ऑनलाईन प्रवेश रद्द करत आहेत. असे प्रवेश रद्द करतांना खाली सूचनांचे पालन करावे.

१) पालक / विद्यार्थ्यांचा प्रवेश रद्द करण्याबाबतचा लेखी अर्ज रद्द करण्याच्या कारणासह (पॉलिटेक्नीक, आयटीआय/इतर कोर्स / परगावी शिक्षणासाठी इ.) स्वाक्षरीसह घेण्यात यावा.
२) प्रवेशाच्या सर्व ऑनलाईन लिंक सुरु झाल्यानंतर विद्यार्थ्यांने दिलेल्या अर्जानुसार ऑनलाईन प्रवेश रद्द करावा. त्यांनतर प्रवेश ऑनलाईन रद्द केल्याची पावती (CGR-Computer Generated Recipt) विद्यार्थ्यास देण्यात यावी.
३) विद्यार्थ्यांनी जर संबधित महाविद्यालयातील फी भरलेली असेल तर प्रवेश रद्द करतांना रु. २००/- (रु.दोनशे मात्र) शुल्क कमी करुन उर्वरित संपूर्ण फी विद्यार्थ्यांस परत करावी. तसेच इ. १० वी चा मूळ शाळा सोडल्याचा दाखला व मूळ गुणपत्रक विद्यार्थ्यांस त्याच वेळी देणेत यावे. त्याबाबतची पोहोच घेण्यात यावी.
४) या कार्यालयाच्या आदेशानंतर अथवा संपुर्ण प्रवेश प्रक्रिया पूर्ण झाल्यानंतर महाविद्यालयाने विद्यार्थ्यांची जनरल रजिस्टर मध्ये नोंद घ्यावी.
५) महाविद्यालयाच्या फी व्यतिरिक्त इतर कोणत्याही प्रकारची फी आकारण्यात येऊ नये. तसेच विद्यार्थ्यांना व पालकांना कोणत्याही प्रकारचे साहित्य महाविद्यालयातून खरेदी करणेबाबत सक्ती करण्यात येऊ नये. (उदा-कॉलेज माहिती पुस्तिका, जरनल, प्रयोगशाळे संबधी साहित्य, गणवेश, शैक्षणिक साहित्य).

उपरोक्त १ ते ५ प्रमाणे योग्य ती कार्यवाही करण्यात यावी, याबाबत या कार्यालयाकडे आपल्या महाविद्यालयाची तक्रारी येणार नाही याची दक्षता घ्यावी.

**(प्रविण आहिरे)**
**सहा. शिक्षण संचालक,**
**पुणे विभाग,पुणे -१**

**प्रत माहितीसाठी**
**१) मा. आयुक्त, शिक्षण, महाराष्ट्र राज्य पुणे-१**
**२) मा. संचालक (माध्यमिक व उच्च माध्यमिक) महाराष्ट्र राज्य पुणे-१**